महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

---

जा.क्र.तं.शि.विकापु/विवि-३/संकीर्ण/२०२१/4003        दिनांक : 9/9/2021

प्रति,
संचालक / प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या
व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणा-या सर्व
पदविका / पदवी / पदव्युत्तर पदवी संस्था
(पुणे विभाग पुणे)

**विषय :- मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाकडून आयोजित केलेल्या घरगुती गणेशोत्सव स्पर्धेला प्रसिध्दी देणेबाबत ...**

संदर्भ :- १) मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई याचा दि. ०२.०९.२०२१ रोजीचा ई-मेल संदेश.
२) उप निवडणूक अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, (निवडणूक शाखा) पुणे यांचे ई मेलव्दारे प्राप्त झालेले पत्र क्र.पीईई-३/जा.क्र./८४८/२०२१ दिनांक ०६.०९.२०२१

उपरोक्त विषयाच्श संदर्भिय पत्रान्वये, मा.मुख्य निवडणूक अधिकारी यांचे कार्यालयाकडून यंदाच्या गणेशोत्सवानिमित्त **"उत्सव गणेशाचा जागर मताधिकाराचा"** हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्या अंतर्गत घरगुती गणेशोज्सव स्पर्धेचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमाचे दस्ताऐवज यासोबत जोडण्यात येत आहेत. याबाबत सदर कार्यकमांच्या साहित्याला प्रसिध्दी देऊन आपल्या संस्थेतील / कार्यालयातील अधिकाधिक स्पर्धक यात सहभागी होतील याबाबतचे निर्देश मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाकडून वरील संदर्भ क्र. १ व २ अन्वये या कार्यालयास प्राप्त झालेले आहेत.सुलभ संदर्भाकरीता संदर्भिय पत्रांच्या छायांकित प्रती सोबत जोडल्या आहेत कृपया त्याचे अवलोकन करण्यात यावे.

तरी या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व संस्थाप्रमुख / कार्यालयप्रमुख यांना कळविण्यात येते की, सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने आपल्या संस्थेतील / कार्यालयातील जास्तीत जास्त मतदार हे स्पर्धक म्हणून या स्पर्धेमध्ये सहभागी होतील यासाठी विशेष प्रयत्न करण्याबाबत तसेच या स्पर्धेबाबत प्रसिध्दी देण्याबाबत आपणास अवगत करण्यात येत आहे.

सोबत : संदर्भिय पत्रांच्या छायांकित प्रती.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : मा.उप निवडणूक अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय (निवडणूक शाखा), बी विंग, चौथा मजला, पुणे-४११००१ यांना माहितीकरीता सविनय सादर.

Directorate Of Technical Education Maharashtra, Mumbai, India

Technical Education regional office Pune <ropune@dtemaharashtra.gov.in>

# मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाकडून आयोजित केलेल्या घरगुती गणेशोत्सव स्पर्धेला प्ररिध्दी देणेबाबत

**Dydeopune Pune** <dydeopune1@gmail.com> 7 September 2021 at 07:51

To: addsplaudit@gmail.com, spladtcl2.ldbpune@gmail.com, dhdokc2669@gmail.com, spladt.sugpune1@gmail.com, fsacl2urbank@gmail.com, patolepravin121@gmail.com, spadtcl2.ubs2pune@gmail.com, co-operative Electins <sceapune@gmail.com>, secscea.pune@maharashtra.gov.in, jcocpsk1@gmail.com, mscacmbpune@gmail.com, rdcf.pune4@gmail.com, acf.pune@maharashtra.gov.in, regdairydevpune@yahoo.co.in, dddopune@gmail.com, ggovtmilkschemepune@yahoo.com, dsaadfpune@gmail.com, jdapune@gmail.com, haveli.tao@gmail.com, djra.pune@gov.in, djradt_pna@rediffmail.com, dsa.pune@coop.maharashtra.gov.in, spladt.sugpune2@gmail.com, drcspune1@gmail.com, statelevelacc30@gmail.com, asstdir-accts.pune@gov.in, commcoop.lekha@gmail.com, mscepune@gmail.com, Directorate Secondary Education <doesecondary@gmail.com>, actdsys@gmail.com, dydsyspune@gmail.com, deputypune@gmail.com, "विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे" <dydpune@gmail.com>, dir.mscert@gmail.com, director@maa.ac.in, audiovisualpune73@gmail.com, govtdtedcollege@yahoo.com, punepayunit.secondary.edu@gmail.com, govurdudedwomen@gmail.com, sietpune@gmail.com, edupri.punezp@gmail.com, auditsquadpune@gmail.com, Rmsa Sr Clerck <rmsapunezp@gmail.com>, Rivgs pune30 <rivgsp1@gmail.com>, nitinware2012@gmail.com, punezpce1@gmail.com, pune1sig@gmail.com, pune2girls@gmail.com, nccgphqpune@gmail.com, 36mahbn Pune <36mahbnpune@gmail.com>, 3mnupune@gmail.com, schooltribunal@gmail.com, dir_adulteducation@yahoo.in, depmah2@gmail.com, ccumscert@gmail.com, Secretary State Board Pune State Board Pune <secretary.stateboard@gmail.com>, sscboardpune@gmail.com, sscpuneboard.lekha@gmail.com, director.dhepune@nic.in, iti.aundhpune@dvet.maharashtra.gov.in, itiaundh1109@yahoo.co.in, iti.pimprichinchwad@dvet.maharashtra.gov.in, itippimchi@yahoo.com, gths.pune@dvet.gov.in, principalgirlsiti@yahoo.com, ropuneacct@yahoo.com, dvoopune@yahoo.com, dvcto.pune@dvet.maharashtra.gov.in, jppune.dte@gmail.com, principal.gpdlpune@gmail.com, office.msihmct@gmail.com, director@coep.ac.in, adapune77@gmail.com, adlpune.dol@maharashtra.gov.in, gdl.pune@dol.maharashtra.gov.in, dlopune.dol@maharashtra.gov.in, diet.pune@mahedu.gov.in, payunitprimarypune11@gmail.com, ropune@dtemaharashtra.gov.in, Joint Director Higher Education Pune Region <jdhepune@gmail.com>, admin@jdhepune.info, aohepune@gmail.com, ddtpho_pune@rediffmail.com, adtp_pune@rediffmail.com, jdtpiwpune@rediffmail.com, jdtpdn_pune@rediffmail.com, eeiwtp_pune@rediffmail.com, ddtptt_pune@rediffmail.com, ddhspune@yahoo.co.in, sfwbcell@gmail.com, fwpune.est@gmail.com, dydhs.sbhivs@gmail.com, ddhs.transport@gmail.com, jtdhsaccount@yahoo.com, adhsvbdpune@yahoo.co.in, statehealthlab@gmail.com, aosphlpune@gmail.com, lep.cash101@gmail.com, ddhsiecb@rediffmail.com, drbandorawalahospital@yahoo.com, sghpune@gmail.com, stdcmh2@rntcp.org, mopmcsulu@gmail.com, smdwt.pune@gmail.com, deanbjmcpune@gmail.com, chesthospital@ymail.com, csaundhpune@yahoo.co.in, hfwtcpune@yahoo.com, hfwtc@yahoo.com, supdtrmhpuneo6@gmail.com, dmopune@rediffmail.com

sir/madam,
Please see the attached file

Thanks & Regards,

Deputy District Election Officer, Pune

**3 attachments**

848 - घरगुती गणेशोत्सव स्पधेला प्रसिध्दी देणेबाबत.pdf
485K

गणेशोत्सव प्रसिद्धी पत्रक (2) (1).pdf
104K

स्पर्धेसाठी नियमावली - सुधारीत (1) (1).pdf
142K

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
08 SEP 2021
7341
आवक क्र.......

# जिल्हाधिकारी कार्यालय (निवडणूक शाखा) पुणे

**बी विंग, चौथा मजला, पुणे -४११००१**

फोन / फॅक्स नं. ०२०-२६१२३७४४ E-mail - dydeopune१@gmail.com

क्र. पीईई-३/जा.क्र./८४८/२०२१
दि. ०६/०९/२०२१

प्रति,

कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख

---------------------------

---------------------------

---------------------------

**विषय :- मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाकडून आयोजित केलेल्या घरगुती गणेशोत्सव स्पर्धेला प्रसिध्दी देणेबाबत.**

संदर्भ :- मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचा दि. २/९/२०२१ रोजीचा ई-मेल संदेश.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये, मा. मुख्य निवडणूक अधिकारी यांचे कार्यालयाकडून यंदाच्या गणेशोत्सवानिमित्त **"उत्सव गणेशाचा जागर मताधिकाराचा"** हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्यांतर्गत घरगुती गणेशोत्सव स्पर्धेचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमाचे दस्तावेज यासोबत पाठविणेत येत आहे. याबाबत सदर कार्यक्रमाच्या साहित्याला प्रसिध्दी देऊन जिल्हयातील अधिकाधिक स्पर्धक यात सहभागी होतील याबाबतचे निर्देश मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाकडून प्राप्त झालेले आहेत.

तरी सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने आपले कार्यालयातील व कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त मतदार हे स्पर्धक म्हणून स्पर्धेमध्ये सहभागी होतील यासाठी विशेष प्रयत्न करण्यात यावेत. तसेच आपल्या अधिनस्त असलेल्या कार्यालयास स्पर्धेबाबत प्रसिध्दी देण्यासाठी अवगत करावे. ही विनंती

(मृणालिनी सावंत)
उप निवडणूक अधिकारी, पुणे

# उत्सव गणेशाचा जागर मताधिकाराचा

दरवर्षी भाद्रपद महिन्यातील गणेश चतुर्थीला महाराष्ट्रातील गणेश भक्तांच्या घरी तसेच सार्वजनिक गणेश मंडळांमध्ये गणेशाचे आगमन होते आणि वातावरण चैतन्याने भरून जाते. स्वातंत्र्यपूर्व काळात समाज प्रबोधनासाठी सुरू केलेली सार्वजनिक गणेशोत्सवाची परंपरा महाराष्ट्र आजही त्याच हिरिरीने जपतो आहे. याच प्रयत्नाचा एक भाग म्हणून यंदा महाराष्ट्र राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय आणि बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समिती यांच्या संयुक्त विद्यमाने 'उत्सव गणेशाचा जागर मताधिकाराचा' हा विषय घेऊन उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

यंदा कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक गणेश मंडळांना देखाव्यांच्या आयोजनावर असलेली बंधने लक्षात घेऊन 'घरगुती गणेशोत्सव सजावट स्पर्धा' आयोजित केली जाणार आहे. सार्वजनिक मंडळांबरोबरच घरोघरीही गणेशाची सुंदर आरास केली जाते. घरोघरी छोटेखानी देखावे साकारले जातात. अशा देखाव्यांच्या माध्यमातून सामाजिक संदेश देखील दिला जातो. या स्पर्धेचा विषय 'उत्सव गणेशाचा जागर मताधिकाराचा' हा आहे. मताधिकार हा १८ वर्षांवरील नागिराकाचा कायदेशीर अधिकार आहे. त्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकाने आपले नाव मतदार यादीत नोंदवणे आणि मताधिकार बजावणे आवश्यक आहे. हे सूत्र केंद्रस्थानी ठेवून गणेश-मखराची सजावट, गणेश दर्शनासाठी घरी येणाऱ्या भाविकांमध्ये, नातेवाईकांमध्ये मतदार नाव नोंदणी, वगळणी यासंबंधीची जागरूकता करण्यासाठी अभिनव कल्पना राबवता येतील. तसेच मताधिकार बजावताना, जात, धर्म, पंथ निरपेक्ष राहून आपला लोकप्रतिनिधी निवडणे, पैसे किंवा इतर आमिषांना बळी न पडता मताधिकार बजावणे, यांसारख्या विषयांवर, घरगुती गणेशोत्सव सजावटीतूनही जागृती करता येऊ शकते. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर आणि समाजमाध्यमांवर स्पर्धेची सविस्तर नियमावली देण्यात आलेली आहे.

या स्पर्धेबरोबरच सार्वजनिक गणेश मंडळांमार्फत निवडणूक आयोगाचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम, तसेच मतदार नाव नोंदणी आणि वगळणी यांसाठी प्रसार-प्रचार केला जाणार आहे. गणेश मंडळाच्या मंडपात आणि ऑनलाइन माध्यमांद्वारेही ही जागृती केली जाणार आहे. मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे आणि बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समितीचे अध्यक्ष ॲड. नरेश दहिबावकर यांनी अधिकाधिक नागरिकांना या उपक्रमामध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

दि. १ जानेवारी २०२२ या अर्हतादिनावर आधारित मतदार याद्यांच्या पुनरीक्षणांचा कार्यक्रम दि. १ नोव्हेंबर २०२१ पासून सुरू होत आहे. यामध्ये १ जानेवारी २०२२ रोजी १८ वर्षे पूर्ण होणाऱ्या नवमतदारांच्या नोंदणीसाठी अर्ज स्वीकारले जातील.

# मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र

आणि

# बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समिती

### यांच्या संयुक्त विद्यमाने

## घरगुती गणेशोत्सव सजावट स्पर्धा
## उत्सव गणेशाचा जागर मताधिकाराचा

दरवर्षी भाद्रपद महिन्यातील गणेश चतुर्थीला महाराष्ट्रातील गणेश भक्तांच्या घरी तसेच सार्वजनिक गणेश मंडळांमध्ये गणेशाचे आगमन होते आणि वातावरण चैतन्याने भरून जाते. स्वातंत्र्यपूर्व काळात समाज प्रबोधनासाती सुरू केलेली सार्वजनिक गणेशोत्सवाची परंपरा महाराष्ट्र आजही त्याच हिरिरीने जपतो आहे. याच प्रयत्नाचा एक भाग म्हणून यदा महाराष्ट्र राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय आणि बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समिती यांच्या संयुक्त विद्यमाने **'उत्सव गणेशाचा जागर मताधिकाराचा'** हा विषय घेऊन घरगुती गणेशोत्सव सजावट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

सार्वजनिक मंडळांबरोबरच घरोघरीही गणेशाची सुंदर आरास केली जाते. घरोघरी छोटेखानी देखावे साकारले जातात. अशा देखाव्यांच्या माध्यमातून सामाजिक संदेशदेखील दिला जातो. या स्पर्धेचा विषय **'उत्सव गणेशाचा जागर मताधिकाराचा'** हा आहे. मताधिकार हा १८ वर्षांवरील नागिराकाचा कायदेशीर अधिकार आहे. त्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकाने आपले नाव मतदार यादीत नोंदवणे आणि मताधिकार बजावणे आवश्यक आहे. हे सूत्र केंद्रस्थानी ठेवून गणेश-मखराची सजावट, गणेश दर्शनासाठी घरी येणाऱ्या भाविकांमध्ये यासंबंधीची जागरूकता करण्यासाठी अभिनव कल्पना राबवता येतील. तसेच मताधिकार बजावताना, जात, धर्म, पंथ निरपेक्ष राहून आपला लोकप्रतिनिधी निवडणे, पैसे किंवा इतर आमिषांना बळी न पडता मताधिकार बजावणे, यांसारख्या विषयांवर आपल्या सजावटीतून जागृती करता येऊ शकते.

चला तर मग, बाप्पाचं स्वागत आणि मताधिकाराचा जागर एकाच मखरात करू या...

**स्पर्धेची नियमावली :**

१. सदर स्पर्धा सर्वांसाठी खुली आहे.

२. सदर स्पर्धेत भाग घेण्यासाठी स्पर्धकाने पुढीलप्रमाणे साहित्य पाठवावे :

२.१ सदर विषयाला अनुसरून केलेल्या सजावटीचे विविध कोनांतून काढलेले **पाच फोटो** पाठवावेत.

२.२ सदर फोटो मूळ स्वरूपातील असावेत, त्यावर कोणाचेही नाव, लोगो, चित्र, फ्रेम, डिजाइन, असे अधिकचे काही जोडू नये.

२.३ प्रत्येक फोटो हा जास्तीत-जास्त २०० KB साइजचा व JPG फॉरमॅटमध्येच असावा. पाचही फोटोंची एकत्रित साइज १ mb पेक्षा जास्त असू नये.

२.४ आपल्या सजावटीची ध्वनिचित्रफीत पाठवताना, ती कमीत-कमी ३० सेकंदांची आणि जास्तीत-जास्त एक मिनिटाची पाठवावी.

२.५ चित्रफीत (व्हिडिओ) अपलोड करताना, मूळ रूपात आहे त्या स्वरूपात पाठवावी, कोणत्याही प्रकारे संपादित (एडिटिंग) करू नये. चित्रिकरण करताना देखाव्याचे वर्णन करतानाचा आवाज मुद्रित (रेकॉर्ड) केल्यास चालेल.

२.६ ध्वनिचित्रफितीची (व्हिडिओची) साईज जास्तीत-जास्त १०० mb असावी तसेच, ही ध्वनिचित्रफित mp4 फॉरमॅटमध्ये असावी.

३ स्पर्धेसाठी निश्चित केलेल्या विषयावर पाच फोटो आणि चित्रफीत पाठवणाऱ्या स्पर्धकाचाच अर्ज ग्राह्य धरला जाईल.

४. आपले फोटो आणि चित्रफीत https://forms.gle/6TxQHaKSAhZmBbQFA या गूगल अर्जावरील माहिती भरून त्यावर पाठवावेत.

५. ज्या स्पर्धकांना फोटो किंवा चित्रफीत (व्हिडिओ) पाठवण्यास अडचण येईल, त्यांनी

श्री. अविराज मराठे - ७३८५७६९३२८, श्री प्रणव सलगरकर - ८६६९०५८३२५ या व्हॉट्सॲप क्रमांकावर संदेश (मेसेज) पाठवून कळवावे.

६. दिनांक १० सप्टेंबर २०२१ ते १९ सप्टेंबर २०२१ या काळात आलेले साहित्यच स्पर्धेसाठी ग्राह्य धरले जाईल.

७. बक्षिसांचे स्वरूप पुढीलप्रमाणे असेल :

अ. प्रथम क्रमांक :- २१,०००/
ब. द्वितीय क्रमांक :- ११, ०००/-
क. तृतीय क्रमांक :- ५,०००/-
ड. उत्तेजनार्थ :- १००० रुपयांची एकूण दहा बक्षिसे.

८. सहभागी सर्व स्पर्धकांना मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय आणि सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समिती यांच्या संयुक्त विद्यमाने प्रमाणपत्र देण्यात येईल.

९. आलेल्या सजावटींमधून सर्वोत्तम सजावटी निवडण्याचा अंतिम निर्णय परीक्षक आणि आयोजक याच्याकडे राहील.

१०. स्पर्धकाने पाठवलेल्या साहित्यावर अन्य कुणी स्वामित्व हक्क सांगितल्यास त्याची पडताळणी करण्याची जबाबदारी सदर स्पर्धकाची असेल.

११. स्पर्धेतील उत्कृष्ट साहित्य मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय आणि बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समिती यांच्या समाजमाध्यमांवर प्रसारित केले जाईल.

*****